।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone: (02462) 229294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 229572 e-mail:directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. : परीक्षा/२०२०-२१/१२३ दिनांक : ०३/०७/२०२०

परीपत्रक

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड
संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर
संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, परभणी,
प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली
प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ

विषय : उन्हाळी २०२० परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या संमतीपत्राबाबत.
संदर्भ : ०१. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र. १२३/विशि-३ दिनांक १९/०६/२०२०

महोदय,

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक ०१ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत प्रस्तुत विद्यापीठाच्या दिनांक २०/०६/२०२० रोजी संपन्न झालेल्या विद्यापरीषदेच्या बैठकीमध्ये व दिनांक २९/०६/२०२० रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील मान्यतेनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

(१) मागील सर्व सत्रात उत्तीर्ण झालेल्या अंतिम सत्रातील/वर्षातील पदवी व पदव्युत्तर अव्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना परीक्षा न देता अंतिम वर्षातील अंतिम सत्रातील ५० टक्के अंतर्गत गुण व ५० टक्के मागील सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या सरासरीच्या आधारे विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार निकाल हवे असल्यास तसे त्यांच्याकडून लेखी स्वरुपात संमती पत्र घेऊन योग्य ते सूत्र वापरुन त्यांचा निकाल घोषित करण्यात येणार आहे. सबब, अशा सर्व इच्छूक विद्यार्थ्यांकडून सोबतचे प्रपत्र 'अ' भरुन घेऊन परीक्षा विभागामध्ये सादर करावेत.

(२) मागील सर्व सत्रात उत्तीर्ण झालेल्या अंतिम सत्रातील/वर्षातील ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची इच्छा असेल तसे त्यांच्याकडून लेखी स्वरुपात संमतीपत्र घेऊन त्यांना परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येणार आहे. अशा विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर विद्यापीठ परीक्षेत्रातील सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, आपत्ती निवारण प्राधिकरण

यांचेशी विचारविनिमय करुन घेण्यात येणार आहे. सबब, अशा सर्व इच्छूक विद्यार्थ्यांकडून सोबतचे प्रपत्र 'ब' भरुन घेऊन परीक्षा विभागामध्ये सादर करावेत.

तरी वरील प्रमाणे इच्छूक विद्यार्थ्यांकडून संमतीपत्र भरुन व त्यावर प्राचार्याची सही व शिक्क्यासह परीक्षा विभागात खालील तक्त्यामध्ये अभ्यासक्रमनिहाय 'अ' व 'ब' प्रपत्राची वेगळी यादी संमतीपत्रासह दिनांक १५/०७/२०२० पर्यंत सादर करावीत जेणेकरुन सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या निकालाबाबत पुढील कार्यवाही करणे सुकर होईल.

**" महाविद्यालयांनी सादर करावयाची यादीचा नमुना "**

महाविद्यालयाचे नांव : .......................................................................................

प्रपत्र 'अ'/प्रपत्र 'ब'

| अनु.क्र. | विद्यार्थ्याचे नांव | आसन क्रमांक | वर्ग |
|---|---|---|---|
| | | | |

(डॉ. रवि एन. सरोदे)
**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**सोबत** : उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा दिनांक १९/०६/२०२० रोजीचा शासन निर्णयानुसार प्रपत्र 'अ' व प्रपत्र 'ब'

**प्रतमाहितीस्तव :**

**०१.** मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तूत विद्यापीठ.
०२. मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
०३. उपकुलसचिव, सहा. कुलसचिव, अधिक्षक/सहा. अधिक्षक, संगणक कक्ष परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

दिनांक :        /        /२०२०

**प्रपत्र ' अ '**

प्रति,
मा. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

विषय : **उन्हाळी - २०२० अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा न देता निकाल जाहीर करण्यासाठीचे संमतीपत्र**

महोदय,

मी (विद्यार्थ्याचे पुर्ण नांव) ........................................................................... आपल्या विद्यापीठाशी संलग्नित ........................................................................... या महाविद्यालयामध्ये .......................................... वर्गाच्या अंतिम सत्राचा नियमित विद्यार्थी असून उन्हाळी - २०२० परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र दाखल केलेले आहे. उन्हाळी - २०२० परीक्षेकरीता माझा आसन क्र. .............................. आहे. मी मागील सर्व सत्र परीक्षा उत्तीर्ण असुन सध्या उद्भलेल्या कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र. १२३/विशि-३ दिनांक १९/०६/२०२० मधील अ(१) नुसार अंतिम वर्षाच्या अंतीम सत्राची परीक्षा न देता ५०% अंतर्गत मूल्यमापनावर आधारीत व ५०% मागील सत्रातील परीक्षेच्या गुणांच्या सरासरीच्या आधारे विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार माझा निकाल जाहीर करण्यास माझी संमती असुन भविष्यात यावर माझा कोणताही आक्षेप राहणार नाही व वरीलप्रमाणे देण्यात येणारा निकाल मला स्विकृत असेल. करीता संमतीपत्र स्वखुशीने लिहून देत आहे.

आपला विश्वासू,

विद्यार्थ्याचे पुर्ण नांव :......................................
पत्ता : ......................................................
.................................................................
मोबाईल क्र. : ..............................................

वरीलप्रमाणे संमतीपत्र पुढील कार्यवाहीसाठी
अग्रेषित करण्यात येते.

महाविद्यालयाच्या प्राचार्याची सही व शिक्का

दिनांक :       /       /२०२०

**प्रपत्र ‘ ब ’**

प्रति,
मा. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

मार्फत : मा. प्राचार्य, ...........................................................................................
.............................................................................. (महाविद्यालयाचे नाव)

विषय : **उन्हाळी - २०२० अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा देण्याबाबतचे संमतीपत्र**

महोदय,

मी (विद्यार्थ्याचे नांव) ................................................................................ आपल्या विद्यापीठाशी संलग्नित ................................................................................ या महाविद्यालयामध्ये ......................................... वर्गाच्या अंतिम सत्राचा नियमित विद्यार्थी असून उन्हाळी - २०२० परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र दाखल केलेले आहे. उन्हाळी - २०२० परीक्षेकरीता माझा आसन क्र. ............................... आहे. मी मागील सर्व सत्र परीक्षा उत्तीर्ण असुन सध्या उद्भलेल्या कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र. १२३/विशि-३ दिनांक १९/०६/२०२० मधील अ(२) नुसार अंतिम वर्षाच्या अंतीम सत्राची परीक्षा द्यावयाची असुन या संदर्भात सर्व बाबीचा मी परिपूर्ण विचार केलेला आहे. माझा परीक्षा देण्याचा निर्णय कायम आहे.

मी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा देण्यासाठी सदरचे संमतीपत्र स्वखुशीने लिहून देत आहे.

आपला विश्वासू,

विद्यार्थ्याचे पुर्ण नांव :.......................................
पत्ता : .......................................................
..............................................................
मोबाईल क्र. : ...............................................

वरीलप्रमाणे संमतीपत्र पुढील कार्यवाहीसाठी
अग्रेषित करण्यात येते.

महाविद्यालयाच्या प्राचार्याची सही व शिक्का